# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनि क्र.:२५६५१४३ E-mail : ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र.: ०७१२–२५६१६६३


क्र. : तंशिसं/विकाना/आस्था/२०११/3090

दिनांक : 29/11/2011

## सुचना

सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर मार्फत दिनांक ०८/१०/२०११ रोजी अपंग व मागासवर्गीयांच्या अनुशेष विशेष मोहीमेअंतर्गत रिक्त पदाची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली असुन विविध यंत्रणेकडुन पदनिहाय उमेदवारांची यादी मागविण्यात आली होती. सदर जाहीरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाची छाणनी करण्यात आली असुन अपात्र उमेदवारांची यादी तसेच दिनांक २६/११/२०११ रोजी घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे वेळापत्रक या कार्यालयाच्या www.rdtenagpur.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असुन पात्र उमेदवाराना त्यांनी नमुद केलेल्या पत्त्यावर परीक्षेचे प्रवेशपत्र टपालाद्वारे पाठविण्यात आलेले आहे.

**कनिष्ठ लिपीक तसेच भांडारपाल** या पदाकरीता दिनांक ०८/१०/२०११ रोजीच्या जाहीरातीमध्ये **एका तासाची** वस्तुनिष्ठ लेखी परीक्षा घेण्यात येईल व टंकलेखन परीक्षा व मुलाखत घेण्यात येईल, असे अनावधानाने नमूद करण्यात आलेले आहे. त्या ऐवजी **१½ (दिड) तासाची** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल. तसेच सदरहु पदाचे टंकलेखन परीक्षा व मुलाखत घेण्यात येणार नाही. तसेच कनिष्ठ लिपीक व भांडारपाल या पदाची लेखी परीक्षा दुपारी १.३० ते २.३० ऐवजी **दुपारी १.३० ते ३.०० पर्यंत** घेण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी. इतर कोणत्याही पदाबाबतीत कोणत्याही प्रकारचे बदल करण्यात आलेले नाहीत.

( गुलाबराव ठाकरे )

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर